# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- comscea.pune@maharashtra.gov.in
secscea.pune@maharashtra.gov.in


निवडणुक/ महत्वाचे

जा.क्र.रासनिप्रा/निवडणुक खर्चअधिसु./५८७ /सन २०१४
दि.२९/१०/२०१४

वाचावे :-

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७३ कब
२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ६५

**अधिसुचना**

ज्या अर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब नुसार राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूकांचे अधिक्षण, निर्देशन, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणावर सोपविण्यात आलेली आहे आणि,

ज्या अर्थी, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने सहकारी संस्थांच्या निवडणूका मोकळया स्वतंत्र व निष्पक्ष वातावरणात पार पाडण्यासाठी उमेदवारांनी करावयाच्या निवडणूक खर्चाची मर्यादा महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या (समिती निवडणूक) नियम २०१४ अन्वये विहित करणे आवश्यक आहे आणि,

१. त्या अर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चे नियम ६५ व राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन सहकारी संस्थांच्या समितीची निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराने निवडणूकी मध्ये करावयाच्या खर्चाची कमाल मर्यादा या अधिसुचनेव्दोर खालील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सहकारी संस्था कार्यक्षेत्र | उमेदवाराने करावयाच्या खर्चा मर्यादा |
|---|---|---|
| १. | संपुर्ण राज्य | रु. ३.०० लाख |
| २. | महसुल विभाग | रु. २.०० लाख |
| ३. | जिल्हा | रु. १.०० लाख |
| ४. | तालुका | रु. ०.५० लाख |
| ५. | गाव | रु. ०.२५ लाख |
| ६. | वॉर्ड | रु. ०.१५ लाख |
| ७. | नगर पालिका / परिषदा | रु. ०.२० लाख |
| ८. | महानगर पालिका | रु. ०.५० लाख |

२. या द्वारे असेही आदेशीत करण्यात येते की, निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराने निवडणूकीत झालेल्या खर्चाचा तपशिल तपशीलवार सोबत जोडलेल्या भाग-१ मधील नमुन्यात सादर करणे बंधनकारक राहील.

३. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने निवडणूकीसाठी झालेल्या खर्चाचा दैनंदिन तपशील भाग-२ मध्ये निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे पुढील दिवसांच्या दुपारी २.०० वाजेपर्यंत सादर करणे बंधनकारक राहील.

४. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने अथवा त्याने प्राधिकृत केलेल्या इसमाने निवडणूकीच्या खर्चाचा स्वतंत्र तपशील नामनिर्देशन पत्र सादर केलेच्या दिनांकाच्या पासून ते निकालाचे दिनांकापर्यंत दोन्ही दिवस धरुन देणे बंधनकारक राहील.

५. परिच्छेद ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे दैनंदिन खर्च निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास सादर करण्यास कसूर करणाऱ्या उमेदवाराचा निकाल घोषित केला जाणार नाही. अ.क्र. १ मधील मर्यादेचे उल्लंघन झाल्यास त्याला जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी/ तालुका किंवा प्रभाग निवडणुक अधिकारी अनर्ह घोषित करील आणि अशारीतीने अनर्ह घोषीत केलेली कोणतीही व्यकती निवडून येण्यासाठी अथवा कोणत्या ही सहकारी संस्थेचा समिती सदस्य म्हणून चालू राहण्यासाठी त्या आदेशाचे दिनांका पासून अनर्ह ठरेल.

भाग १ मधील खर्चाचा तपशील निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने निवडणूकांच्या निकालाचे दिनांक पासून ३० दिवसांच्या आत जिल्हा/ तालुका किंवा प्रभाग निवडणूक अधिकारी यांना सादर करणे यांना बंधनकारक राहील. तसेच जिल्हा/ तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी सादर केलेल्या खर्चाची पोहोच पावती स्वत:च्या सही शिक्क्या निशी उमेदवारा देईल.

६. निवडणूक खर्चाच्या संदर्भातील बाब निहाय खर्चाच्या पावत्या उमेदवाराने घेणे आवश्यक राहील.

७. भाग १ मधील खर्चाच्या तपशीला सोबत निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने शपथेवर सादर केलेले प्रतिज्ञाप्रत्रामध्ये त्याने केलेल्या सर्व खर्चाचा तपशिल भाग -१ मध्ये नमुद केला आहे आणि "**भाग -१ मधील नमुद केलेल्या खर्चा व्यतिरिक्त खर्च केलेला नाही**" याचाही समावेश असेल.

८. जिल्हा/ तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकाऱ्यांन भाग-१ मधील खर्चाची तपासणी आणखी खात्री करुन, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास निवडणूक लढविणारे उमेदवाराने केलेला खर्च स्वीकार्ह, अचूक आणि पुर्ण असलेचे कळविणे बंधक कारक राहील.

९. खर्चाचे संपुर्ण तपशील जिल्हा सहकारी निवडणूक अधिकाऱ्याने / तालुका/प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी यांनी तपासणी साठी मागितल्यास निवडणूक लढविणारे उमेदवाराने सादर करणे बंधनकारक राहील.

१०.निवडणूक लढविणारे प्रत्येक उमेदवारने स्वतंत्र बँक खाते उघडून त्या खात्याद्वारेच निवडणूक खर्च करणे बंधनकारक राहील, तसेच त्या खात्याचा संपुर्ण तपशील देखील निवडणूक निर्णय अधिकारी आणि जिल्हा /तालुका/प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी यांचेकडे सादर बंधनकारक राहील.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांचे मान्यतेने व निर्देशानुसार.**

29/10/14

**(डॉ.आनंद जोगदंड)**
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य पुणे.

प्रति,

१. तालुका / वार्ड सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व)
२. जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व).
३. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

२/- त्यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश त्यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सर्व सहकारी संस्थांच्या निदर्शनास आणावे.

**प्रत सस्नेह रवाना** :- १.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. संचालक, हातमाग,यंत्रमाग व वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपुर
४. आयुक्त (दुग्ध विकास), महाराष्ट्र राज्य, अब्दुल गफार खान मार्ग, वरळी सी फेस, मुंबई